शोधप्रबंधाचा आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

मानव विज्ञान विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील

पीएच्.डी.पदवीसाठी सादर करण्यात येणारा शोधप्रबंधाचा संक्षिप्त आराखडा

‘‘नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या आर्थिक स्थितीचा विश्लेषणात्मक अभ्यास (२०१०-११ ते २०१९-२०)’’

विषय :- अर्थशास्त्र

संशोधिका

अश्विनी नागोराव कसबे

मार्गदर्शक

डॉ.रत्नाकर रामराव कांबळे

अर्थशास्त्र विभाग, शारदा महाविद्यालय, परभणी

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जुलै २०१९

अनुक्रमणिका

१.	प्रस्तावना (Introduction)		३
२.	विषयाचे महत्त्व (Importance of the Study)		५
३.	विषय निवड (Selection of the Topic)		८
४.	संशोधनाचे उद्देश्य (Objectives of the Study)		८
५.	संशोधनाची गृहितके (Hypothesis of the Study)		९
६.	संशोधन पद्धती (Research Methodology)		९
	अ.	विवेचनात्क व विश्लेषणात्मक पद्धती (Descriptive and Analytical Study)	१०
	ब.	प्राथमिक साधन सामुग्री (Primary Data)	१०
	क.	दुय्यम साधन सामुग्री (Secondary Data)	११
	ड.	नमूना निवड (Sampling Method)	११
७.	संशोधनाचा कालखंड (Reference Period of the Study)		१२
८.	संशोधनाचे भौगोलिक क्षेत्र (Geographical area of Study)		१२
९.	संशोधनाची व्याप्ती व मर्यादा (Scope & Limitation of the Study)		१२
१०.	संशोधनाची नियोजित प्रकरणे (Chapter’s Scheme)		१३
११.	संदर्भसूची (References)		१४

“नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या आर्थिक स्थितीचा विश्लेषणात्मक अभ्यास”
(२०१०–११ ते २०१९–२०)

१.१ प्रस्तावना (Introduction) :-

ग्रामपंचायत हा भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थामधील मूलभूत घटक असून, त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमध्ये तो महत्त्वाचा घटक आहे. ग्रामपंचायतीसारखा स्थानिक स्वराज्य संस्था ही मुख्यत्त्वे करून ग्रामीण भारताच्या विकासासाठी निर्माण करण्यात आलेल्या संस्था आहेत. भारतातील ह्या संस्थांचा इतिहास खूप प्राचीन असून त्यांचा खरा विकास स्वातंत्र्योत्तर काळातच झालेला दिसतो. स्वातंत्र्योत्तर काळात या संस्थांचे महत्त्व वाढत जाण्याचे महत्त्वाचे कारण, ह्या राष्ट्रीय स्तरावर ग्रामीण भागाला दिलेले महत्त्व हेच आहे.

ग्रामीण भागातील लोकांच्या दैनंदिन गरजांची पूर्ती करणाऱ्या संस्था म्हणून ग्रामपंचायतीचे महत्त्व संपूर्ण देशात वाढत आहे. या संस्था ग्रामीण भागातील रस्ते, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सांडपाणी, आरोग्य, दिवाबत्तीची व्यवस्था, शिक्षण इत्यादी अशा अनेक कार्यांची जबाबदारी पार पाडत असतात. वरील कार्य पार पाडत असताना, आर्थिक व्यवस्थापन हा महत्त्वाचा घटक आहे.

पंचायतराजमधील सर्वात खालचा पण महत्त्वाच्या टप्प्याला ग्रामपंचायत म्हणतात. याला ग्रामसभेची कार्यकारी समिती असेही म्हणतात. ग्रामपंचायतीचा कारभार महाराष्ट्रात लागू असणाऱ्या मुंबई ग्रामपंचायत कायदा १९५८ कलम ५ अन्वये चालतो. नवीन ग्रामपंचायत स्थापना करण्याचा अधिकार विभागीय

आयुक्तांना असतो. ग्रामपंचायत निर्मितीसाठी किमान ६०० लोकसंख्या असणे आवश्यक असून डोंगरी भागात हे प्रमाण ३०० आहे. ग्रामपंचायत सदस्यांची संख्या कमीत कमी ७ व जास्तीत जास्त १७ असून ते लोकसंख्येवर निश्चित करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना असतात.

ग्रामपंचायतीचा इतिहास पाहिला असता, वैदिक काळापासून त्या अस्तित्त्वात आहेत. ग्राम हे प्रामुख्याने ग्रामीण भागातील आहे. उत्तर वैदिक काळामध्ये राजा हा ग्रामशासक असायचा. बौद्धकालीन ग्रामपरिषदेमध्ये ‘ग्रामवृद्ध’ सामिल होते. याच्या प्रमुखास ‘ग्रामभोजक’ असे म्हणत. परिषद अथवा पंचायत ही गावाच्या जमीनीची व्यवस्था करत असे तसेच गावामध्ये शांती आणि सुरक्षा अस्तित्त्वात ठेवण्यासाठी ग्रामभोजकाची मदत करत असे. जनहिताचे कार्य देखील ती करत असे. स्मृतिग्रंथामध्येही ग्रामपंचायतीचा उल्लेख आहे. कौटिल्यने ग्रामपंचायतीस राजनीतिचे अंग मानले आहे.

त्याचप्रमाणे आधुनिक स्वशासनाचा पाया ब्रिटिश कालखंडात रोवला गेला. ब्रिटिशांच्या छावण्या नागरी भागात स्थायिक झाल्याने ब्रिटिशांनी ग्रामीण स्थानिक स्वशासनाच्या अगोदर प्रथमतः नागरी स्थानिक संस्थेकडे लक्ष दिले. नागरी भागात मूलभूत सुविधा व मूलभूत स्वरूपाची कार्ये पार पाडण्यासाठी नागरी स्थानिक संस्था सुरू करण्यात आल्या. स्वातंत्र्योत्तर भारतात मात्र ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेकडे म्हणजे ग्रामपंचायतीकडे विशेष लक्ष पुरविले गेले. गांधीने देखील भारतात ७ लक्ष खेडी असल्याचा उल्लेख करीत सर्वसामान्य माणसांनी खेड्याकडे जावे असे संदेश दिले.

१.२ विषयाचे महत्त्व (Importance of the Study):-

फार प्राचीन काळापासून भारतात ग्रामपंचायती अस्तित्त्वात आहेत. कारण प्राचीन काळापासूनच बव्हंशी समाज ग्रामीण भागामध्ये वास्तव्य करत राहत होता. म्हणूनच ग्रामीण भागातील लोकांना आपल्या गावाचा कारभार आपण पहावयाची ही ग्रामपंचायतीमागची भूमिका भारतीयांसाठी नवीन नाही. गावात निर्माण होत असणारे संघर्ष हे गावातीलच पंच-मंडळीच्या सल्ल्याने मिटवले जात असत. ज्या अडचणी-समस्यांचे निराकरण करणे गावात शक्य नाही अशा अडचणी राजदरबारी कळविणे व त्या दूर करण्यासाठी राजांना विनंती करणे, गावातील लोकांकडून पालन करून घेणे आणि गावात एकोप्याचे व सहकार्याचे वातावरण टिकून ठेवण्यासाठी प्रयत्न करणे, म्हणजेच नागरी विषयक व न्यायविषयक कार्ये सुद्धा याच पंचमंडळीच्या माध्यमातून पूर्ण केली जात असत.

प्राचीन काळात गाव हे सामाजिक व राष्ट्रीय जीवनाचे अंग असल्यामुळे प्रशासन व्यवस्थेत गावास महत्त्वाचे स्थान होते हे आपणास प्राचीन काळातील अनेक पुराव्यांवरून लक्षात येते. महाभारतातील 'सभापर्व', 'जातक-कथा', 'चाणक्याचे अर्थशास्त्र', मौर्यकाळातील 'विनय पिटिका' इ. ग्रंथामध्ये सुद्धा प्राचीन काळातील ग्रामपंचायतीचे वर्णन दिसून येते.

स्थानिक प्रशासनाची अविभाज्य अंग असलेली ग्रामपंचायत भारतामध्ये केव्हापासून अस्तित्त्वात आली, त्यावेळेस तिचे स्वरूप कसे होते, हे सांगणे अतिशय अवघड आहे. असा अंदाज व्यक्त केला जाऊ शकतो की ज्यावेळेस मानवी समाज उदयास आला त्याचवेळेस ही ग्रामपंचायत (स्थानिक संस्था) अस्तित्त्वात आली असावी. पाच व्यक्तींची (पंचायत) सभा एक प्राचीन संस्था आहे, जी नैसर्गिकपणे

अस्तित्त्वात आली. आजच्यासारख्या विशिष्ट अशा कायद्याद्वारे तिची निर्मिती झालेली नव्हती.

गावातील सर्व व्यवहार ग्रामपंचायतीच्या माध्यमातूनच चालत असत. गावातील वयोवृद्ध, चारित्र्यवान, वचक असणारी व ज्ञानसंपन्न व्यक्ती अशा ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी असे. नैसर्गिक आपत्तीच्या वेळेस गावातील सर्वजण एक होऊन तोंड देत असत. तसेच गावाचे संरक्षण सुद्धा ग्रामपंचायतीच करीत असत. या संदर्भात डॉ.के.पी.जयस्वाल आपल्या ''Hindu polity, a constitutional history of India in Hindu Times'' या ग्रंथात लिहितात की, प्राचीन उपलब्ध लिखाणावरून असे म्हटले जाऊ शकते की, ''राष्ट्रीय जीवन आणि कार्याची अभिव्यक्ती ग्रामसभेच्या माध्यमातून होत होती. म्हणजेच प्राचीन काळात गाव एक छोटेसे प्रजासत्ताक होते. समूह करून राहण्याची त्यांची प्रवृत्ती होती. स्वसंरक्षणासाठी एकमेकांची मदत घेत होते. राजा मात्र क्वचित प्रसंगीच गावाच्या कारभारात हस्तक्षेप करीत असे.''

यावरून असे लक्षात येते की, प्राचीन काळात ग्रामीण व नागरी अशा दोन्ही क्षेत्रात स्थानिक संस्था अस्तित्त्वात होत्या. परंतु रचनेबाबत दोन्ही संस्थांमध्ये भिन्नता होती पण भारतात जास्तीत जास्त लोक ग्रामीण भागात राहतात आणि ग्रामीण भागातील स्थानिक संस्थाचा ग्रामीण क्षेत्रातील लोकांवर जो प्रभाव पडला तेव्हा प्रभाव शहरातील लोकांवर पडला नाही. म्हणूनच प्राचीन काळात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांपेक्षा ग्रामीण स्वराज्य संस्थांस अधिक महत्त्व आहे.

ग्रामपंचायत स्थानिक स्तरावरील काम प्रामुख्याने पाहत असते. त्यामध्ये ग्रामसुचीत नमूद केलेल्या विषयांपैकी कोणत्याही विषयाबाबत ग्रामनिधीतून वाजवी

तरतूद करते, पाणीपुरवठा परियोजना स्वीकारून तिची देखभाल करते, गावातील लोकांचे आरोग्य, शिक्षण, सुरक्षितता आणि सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक कल्याण यांची वाढ होऊ शकेल असे काम किंवा योजना गावात पार पाडण्यासाठी तरतूद करीत असते, आपल्या क्षेत्रातील शेतीच्या उत्पादनात वाढ आणि सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करते. गावातील इमारत, गुरांचा गोठा, झोपडी किंवा अन्य तऱ्हेच्या जागांना क्रमांक देण्याचे कार्य ग्रामपंचायतीस करावे लागते.

ग्रामपंचायत ही स्थानिक क्षेत्रात कार्य करणारी संस्था असल्यामुळे ग्रामपंचायतीस स्थानिक प्रश्न सोडविण्याचे कार्य करावे लागते. अलीकडे या कार्यात व्यापक प्रमाणात वाढ झालेली दिसून येत आहे. अशाप्रकारे आजच्या आधुनिक काळात ग्रामपंचायतीचे महत्त्व अनन्य साधारण दिसून येते.

''नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या आर्थिक स्थितीचा विश्लेषणात्मक अभ्यास'' (२०१०-११ ते २०१९-२०) करण्यासाठी संशोधनकर्त्याने नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीचा आर्थिक स्थितीमुळे होणाऱ्या ग्रामीण भागाचा विकास व त्यामुळे ग्रामीण समाजाच्या विविध समस्या व ग्रामपंचायतीच्या कार्याचे त्यांच्याशी असलेले संबंध याचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. आर्थिक स्थिती हे ग्रामपंचायतीच्या संदर्भात सर्वात महत्त्वाचे ठरते. ग्रामपंचायतीला उपलब्ध असणारी उत्पन्नाचे स्त्रोत ग्रामीण भागावर अवलंबून असल्यामुळे कमी असतात, शासनाकडून मिळणारे अनुदान यात महत्त्वाचे ठरते. त्या तूलनेत खर्चाचे प्रमाण जास्त असते. या सर्वांचा परिणाम अंततः ग्रामीण विकासावर होतो हे लक्षात घेता, प्रस्तुत विषयाची निवड संशोधकाने केली आहे.

१.३ विषयाची निवड (Selection of the Topic):-

''नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या आर्थिक स्थितीचा विश्लेषणात्मक अभ्यास'' (२०१०-११ ते २०१९-२०) करण्यासाठी संशोधनकर्त्याने नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीचा आर्थिक स्थितीमुळे होणाऱ्या ग्रामीण भागाचा विकास व त्यामुळे ग्रामीण समाजाच्या विविध समस्या व ग्रामपंचायतीच्या कार्याचे त्यांच्याशी असलेले संबंध याचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. आर्थिक स्थिती हे ग्रामपंचायतीच्या संदर्भात सर्वात महत्त्वाचे ठरते. ग्रामपंचायतीला उपलब्ध असणारी उत्पन्नाचे स्त्रोत ग्रामीण भागावर अवलंबून असल्यामुळे कमी असतात, शासनाकडून मिळणारे अनुदान यात महत्त्वाचे ठरते. त्या तुलनेत खर्चाचे प्रमाण जास्त असते. या सर्वांचा परिणाम अंततः ग्रामीण विकासावर होतो. हे लक्षात घेता, प्रस्तुत विषयाची निवड संशोधकाने केली आहे.

१.४ संशोधनाची उद्दिष्ट्ये (Objectives of the Study) :-

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत :-

१. नांदेड जिल्ह्यातील पंचायतराज व्यवस्थेचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे.

२. नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाच्या स्त्रोतांचा अभ्यास करणे.

३. नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या खर्चाचा अभ्यास करणे.

४. नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या अंदाजपत्रकांचा अभ्यास करणे.

५. नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना मिळालेल्या शासकीय योजनांचा अभ्यास करणे.

६. नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या आर्थिक समस्यांचे विश्लेषणात्मक अभ्यास करणे.

१.५ संशोधनाची गृहितके (Hypothesis of the Study) :-

प्रस्तुत संशोधनाची गृहितके पुढीलप्रमाणे आहेत :-

१. नांदेड जिल्ह्यातील आर्थिक विकासात ग्रामपंचायतीची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

२. नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या उत्पन्नांचे स्त्रोत मर्यादित आहेत.

३. नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या खर्चाचे प्रमाण जास्त आहे.

४. ग्रामपंचायतीचे अंदाजपत्रक शास्त्रोक्तपद्धतीने केले जात नाही.

५. नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीना शासकीय योजनेचा जास्त लाभ झाला आहे.

१.६ संशोधन पद्धती (Research Methodology) :-

प्रस्तुत संशोधनासाठी नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग संशोधनासाठी करण्यात येईल.

प्रस्तुत संशोधन ऐतिहासिक सर्वेक्षण स्वरूपाचे असून यात वर्णनात्मक पद्धतीचाही उपयोग करण्यात येईल. यात सांख्यिकीय विश्लेषण पद्धतीचा वापर या

संशोधनाचे वैशिष्ट्य आहे हे लक्षात घेऊन संशोधकाने संशोधनपद्धतीची निवड केली जाईल व त्याचा वापर करण्यात येणार आहे. ते खालीलप्रमाणे असतील :-

संशोधनाच्या माहितीचे स्त्रोत (Research Resources) :-

अ. विवेचनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धती (Descriptive and Analytical Study) :-

प्रस्तुत संशोधन हे ऐतिहासिक स्वरूपाचे संशोधन आहे हे लक्षात घेता, संशोधकाने अशा संशोधनास अनुकूल ठरणाऱ्या संशोधन पद्धतीची निवड करण्यात येईल. संशोधनासाठी प्राथमिक तथ्य संकलन व दुय्यम तथ्य संकलनाच्या विविध मार्गांचा अवलंब केला जाईल.

ब. प्राथमिक माहिती स्त्रोत (Primary Data) :-

प्राथमिक माहिती स्त्रोतात संशोधकाने ग्रामपंचायतीच्या आर्थिक स्थितीचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्यासाठी खालीलप्रमाणे घटकांचा वापर केला जाईल.

१. निरीक्षण

२. सर्वेक्षण

३. प्रश्नावली

४. मुलाखत

५. प्रत्यक्ष भेटी

यापमाणे प्राथमिक माहिती संकलित करण्यात येईल.

क. दुय्यम माहिती स्त्रोत (Secondary Data) :-

प्रस्तुत संशोधनात संशोधनकर्त्याने दुय्यम माहितीचे स्त्रोतात खालीलप्रमाणे साधनांचा वापर केला आहे :-

१. व्यक्तिगत प्रलेख

२. दैनंदिनी

३. वर्तमानपत्रे

४. सार्वजनिक प्रलेख

५. प्रकाशित पुस्तके

६. शासकीय गॅझेटियर

७. मासिके

८. संशोधन अहवाल

९. दुर्मिळ रेकॉर्ड

१०. नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतविषयक अहवाल

११. इंटरनेट

याप्रमाणे नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीचा आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी या साधनांचा पुरेपूर वापर करण्यात येईल.

ड. नमूना निवड (Sampling Method) :-

या संशोधनासाठी संशोधनकर्त्याने सर्वात महत्त्वाचा आणि संशोधनासाठी मुख्य गाभा मानला जातो ते म्हणजे संशोधनपद्धतीची निवड. यामध्ये संशोधकाने निरीक्षण

केल्यास नांदेड जिल्ह्यात एकूण १६ तालुके आहेत. त्यामध्ये संशोधकाने १६ तालुक्यांची निवड केली आहे. त्यामध्ये प्रत्येक तालुक्यातील पाच ग्रामपंचायतीची म्हणजे एकूण ८० ग्रामपंचायतीची नमूना म्हणून निवड लोकसंख्या सांख्यिकीय पद्धतीने करण्यात आलेली आहे.

१.७ संशोधनाचा कालखंड (Reference Period of the Study):-

प्रस्तुत संशोधनाचा कालखंड २०१०-२०११ ते २०१९-२०२० अशा दहा वर्षांचा कालखंड असेल.

१.८ संशोधनाचे भौगोलिक क्षेत्र (Geographical area of Study):-

प्रस्तुत संशोधनाचे भौगोलिक क्षेत्र हे नांदेड जिल्हा असून त्यात १६ तालुक्यांचा समावेश आहे.

१.९ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा (Scope & Limitation of the Study) :-

अ. प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती खालीलप्रमाणे मांडता येते.

संशोधनकर्त्याने प्रथमतः नांदेड जिल्ह्याचा अभ्यास करण्यासाठी घेतला आहे. नांदेड जिल्ह्यात एकूण १६ तालुक्यांचा समावेश असून नांदेड जिल्ह्यात लोहा, कंधार, अर्धापूर, धर्माबाद, माहूर, मुदखेड, मुखेड, नायगाव, उमरी, बिलोली, किनवट, हिमायतनगर, हदगाव, भोकर, नांदेड, देगलूर या तालुक्यातील ग्रामपंचायतीचा आर्थिक स्थितीचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधात करण्यात येईल.

यामध्ये ग्रामपंचायतीचे होणाऱ्या कार्याचा व त्यातील आर्थिक स्थिती याबाबतीत संशोधनकर्ता संशोधन करण्यासाठी ‘‘नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या आर्थिक स्थितीचा विश्लेषणात्मक अभ्यास’’ (२०१०-११ ते २०१९-२०) या विषयाची निवड केली आहे.

ब. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने आपले संशोधन ‘‘नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या आर्थिक स्थितीचा विश्लेषणात्मक अभ्यास’’ या दृष्टीने केले आहे.

१. प्रस्तुत अध्ययनाचे क्षेत्र नांदेड जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे.

२. प्रस्तुत अध्ययनाचे क्षेत्र, भौगोलिक क्षेत्र नांदेड जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे.

३. प्रस्तुत अध्ययन नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीपुरते मर्यादित आहे.

४. प्रस्तुत संशोधनाचे आर्थिक वर्ष २०१०-२०११ ते २०१९-२०२० या कालावधीपुरते मर्यादित आहे.

१.१०संशोधनाची नियोजित प्रकरणे (Chapter’s Scheme) :-

प्रस्तुत संशोधनाची मांडणी खालीलप्रमाणे करण्यात आली आहे.

१. प्रकरण पहिले - प्रस्तावना

२. प्रकरण दुसरे - संशोधन साहित्याचा आढावा व संशोधन पद्धती

३. प्रकरण तिसरे - नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीची आर्थिक व सामाजिक उद्दिष्ट्ये

४. प्रकरण चौथे - नांदेड जिल्ह्याच्या ग्रामपंचायतीचे उत्पन्नाचे स्त्रोत

५.	प्रकरण पाचवे –	नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या खर्चाचे स्त्रोत

६.	प्रकरण सहावे –	नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीपुढील समस्या

७.	प्रकरण सातवे –	निष्कर्ष व शिफारशी

(टीप :- वरील संशोधन आराखडा स्थूल स्वरूपात असून, प्रत्यक्ष संशोधनाचे कार्य करतेवेळी त्यात बदल होण्याची शक्यता आहे.)

१.११ संदर्भसूची (References) :-

१. डॉ.सुधीर बोधनकर, प्रा.विवेक आलोणी, ॲड.मृणाल कुलकर्णी, 'सामाजिक संशोधन पद्धती', जानेवारी २००७, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२. डॉ.पी.एल.भांडारकर, 'सामाजिक संशोधन', १९९७, विद्या बुक्स, औरंगपुरा, औरंगाबाद.

३. प्रा.गोविंद यमलवाड, 'स्थानिक स्वराज्य संस्था', २००१, कल्पना प्रकाशन, नांदेड

४. रा.ना.देशमुख, 'आपला नांदेड जिल्हा', जून २००८, कल्पना प्रकाशन, नांदेड.

५. डॉ.प्रभाकर देशमुख, 'व्यवस्थापन प्रक्रिया', १९८८, पिंपळापुरे प्रकाशन ॲण्ड बुक पब्लिशर्स, नागपूर-१०.

६. नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीचा अहवाल.

७. वर्तमानपत्रे.

८. सेन्सेक्स बुक

९. वेबसाईट

1. www.nandeddistrict.org.
2. www.nandedcity.com
3. www.maharashtra.nic.com
4. wikipidia

संशोधिका | **मार्गदर्शक**

अश्विनी नागोराव कसबे

डॉ.आर.आर.कांबळे
शारदा महाविद्यालय, परभणी